**महाराष्ट्र शासन**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय,**
**डॉ.अनी बेझंट मार्ग,मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१**
दूरध्वनी क्रमांक –(०२०)२६१२४५७२ ई-मेल :- depmah2@gmail.com

---

क्र.प्राशिसं/सांख्यिकी/केंद्रप्रमुख/५०३/ 3601 दिनांक- 08 /०५/२०२३

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जि.प. सोलापूर.

**विषय :- केंद्रप्रमुख पदोन्नतीकरीता मार्गदर्शन मिळणेबाबत ....**
**संदर्भ** :-१)शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण -२०२२/ प्र.क्र.८१/ टिएनटी-१ दिनांक -०१ डिसेंबर, २०२२
२) शासन शुद्धिपत्रक क्रमांक :- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८१/टिएनटी-१, दि.-९ मार्च, २०२३
३) आपले कार्यालयाकडील पत्र जा.क्र. जिपसो/शिक्षण/अजिब/४२२/२०२३, दि.-०२ मे, २०२३

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार आपल्या कार्यालयामार्फत केंद्रप्रमुख पदोन्नती विषयक मार्गदर्शन मागविले आहे. राज्यातील केंद्र प्रमुख भरती प्रक्रीये संदर्भात दि. ०१-१२-२०२२ रोजी काढलेल्या शासन निर्णयामध्ये केंद्र प्रमुखांची ५० टक्के पदे पदोन्नतीने व ५०% पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे त्या त्या कोट्याच्या मर्यादेत भरण्यात येतील" व दिनांक ०९/०३/२०२३ च्या शुद्धिपत्रकानुसार "ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी अखंड नियमित सेवा (शिक्षण सेवक कालावधी वगळून) पूर्ण केली असेल अशा उमेदवारामधून सेवा ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल." असे निर्देश आहे.

दिनांक ०१-१२-२०२२ पूर्वी **केंद्र प्रमुख पदभरती संदर्भात** निघालेल्या सर्व शासन निर्णय/शासन शुद्धिपत्रक अधिक्रमित करून दि. ०१-१२-२०२२ रोजीचा शासन निर्णय अंतिम करण्यात आलेला असून सदर **शासन निर्णयात विषया संबंधित कोणताही उल्लेख केलेला नाही.** तसेच शासन शुद्धिपत्रक दि.०९/०३/२०२३ नुसार पदोन्नती करीता प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) यामधूनच केंद्र प्रमुख पदी पदोन्नती बाबत निर्देश आहेत.

त्यामुळे शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०२२ व शासन शुद्धिपत्रक दि.०९/०३/२०२३ अन्वये नियमानुसार पदोन्नती विषयक कार्यवाही करावी.

(शरद गोसावी)
शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
म.रा., पुणे-01